1 5 OCT 2025
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणूसपणाला आवाहन करणाऱ्या कथा लिहा : आसाराम लोमटे

## शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शोषण आणि विषमता याविरुद्ध हुंकार भरणाऱ्या, माणूसपणाला आवाहन करणाऱ्या अनुभवसिद्ध कथा नवलेखकांनी लिहाव्यात, असे आवाहन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक आसाराम लोमटे यांनी केले. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (मुंबई) आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने एकदिवसीय नवलेखक कथालेखन कार्यशाळेत ते बोलत होते.

लोमटे म्हणाले, कथालेखनाची एकच एक अशी 'रेसिपी' नसते, तसेच ती सरधोपटपणे सांगावयाची गोष्ट नसते. प्रत्येक व्यक्तीचे आपापले स्वतंत्र विश्व असते, स्वतंत्र शैली आणि कल्पना असते. त्यामुळे जे अंतःकरणातून येते, जे अस्वस्थ करते, आपल्या माणूसपणाला आवाहन करत आतून हलवून टाकते आणि आपल्या जगण्याला पार बदलवून टाकते, अशा गोष्टी सांगता आल्या पाहिजेत.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित नवलेखक कथालेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आसाराम लोमटे.**

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथाकार डॉ. किरण गुरव म्हणाले, भाऊ पाध्ये, भास्कर चंदनशिवे, व्यंकटेश माडगूळकरांपासून जयंत पवारांपर्यंत कित्येक दिग्गजांनी जो साहित्यप्रकार आपल्या लेखनाने, शैलीने समृद्ध केला आणि ज्याद्वारे जीवनाची समग्रता व्यक्त होते, असा हा प्रकार गौण असूच शकत नाही.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे यांनी, लोकांच्या जगण्याचे प्रतिबिंब असलेल्या कथांनाच लोकमान्यता मिळते, असे सांगितले.

अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले. कार्यशाळेस डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, जयसिंग पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2025
सकाळ

# कथालेखनाची एकच 'रेसिपी' नसते

## आसाराम लोमटे; विद्यापीठात नवलेखक कथालेखन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १४ : 'कथालेखनाची एकच एक अशी 'रेसिपी' नसते. प्रत्येक व्यक्तीचे आपापले स्वतंत्र विश्व, शैली, कल्पना असते. त्यामुळे जे अंतःकरणातून येते, जे अस्वस्थ करते, आपल्या माणूसपणाला आवाहन करीत आतून हलवून टाकते आणि आपल्या जगण्याला पार बदलवून टाकते, अशा गोष्टी सांगता आल्या पाहिजेत', असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक आसाराम लोमटे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभागातर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने नवलेखक कथालेखन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या उद्‍घाटनप्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथाकार किरण गुरव प्रमुख उपस्थित, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.



आसाराम लोमटे

लोमटे यांनी, आजच्या कालखंडात गोष्ट सांगण्यातला, ऐकण्यातला निवांतपणा हरपला असला, तरी कथन परंपरा टिकविण्यासाठी या परंपरेचे पूर्वसंचित आपणाला नव्याने सामोरे आणावे लागेल. त्यादृष्टीने नवलेखकांकडून मोठ्या अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. किरण गुरव यांनी कथाप्रकाराला गौणत्व देण्याच्या मानसिकतेवर बोट ठेवले. भावना, कल्पना, बुद्धीचातुर्य आणि वास्तव यांचा मेळ घालून कथाकार आपली गोष्ट संपन्न करीत असतो. हे नवलेखकांनी समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले.

**विविध सत्रांमध्ये मान्यवरांचे मार्गदर्शन**

कार्यशाळेत दिवसभरात 'कथानिर्मिती व अनुभव' याविषयावर प्रसाद कुमठेकर (मुंबई), विवेक कुडू (पालघर), डॉ. नंदकुमार मोरे यांनी, तर 'कथानिर्मिती: आकार आणि अनुभव' याबाबत सुचिता घोरपडे (पुणे), फारुक काझी (सांगोला), नीला जोशी, कवी प्रवीण बांदेकर यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2025
तरुण भारत

# जागतिक अन्न दिनी विद्यापीठात आजपासून दोन दिवस कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागामार्फत जागतिक अन्न दिनानिमित्त (वर्ल्ड फुड डे) बुधवारी, १५ आणि गुरूवार १६ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन केल्याची माहिती अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी दिली. बुधवारी शाश्वत अन्न प्रणालीवर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये 'शेती ते शाश्वत भविष्य' संकल्पनेवर आधारित 'शाश्वत अन्न प्रणाली'वर एम.एस्सी. विद्यार्थ्यांमार्फत पोस्टर प्रदर्शनातून अन्न प्रणालीतील प्रत्येक घटकाच्या जबाबदारीविषयी माहिती देण्यात येणार आहे. गुरुवारी, १६ रोजी अन्न व औषध प्रशासनांच्या संयुक्त विद्यमाने जागरूकता कार्यक्रम आयोजित केला आहे. शेतकरी, खाद्यपदार्थ व्यावसायिक, हॉटेल मालक संघ व सभासद, प्रक्रिया उद्योगांचे प्रतिनिधी, शासकीय संस्था व अधिकारी, विद्यार्थी, शिक्षण संस्था व कर्मचारी उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2025
तरुण भारत



# विद्यापीठात सामाजिक शास्त्र संशोधन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेंतर्गत सामाजिक शास्त्र संशोधन : पद्धती आणि विश्लेषण विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये नवसंशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत डॉ. विमल त्रिवेदी यांनी 'प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांमधील फरक समजणे, नमुना निवड संकल्पना, मुलाखत अनुसूची, प्रश्नावली, स्केलिंग, डेटा विश्लेषण" विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. संदीप चौधरी यांनी 'सामाजिक संशोधनात सिद्धांताचा वापर" विषयावर तर डॉ. सुजाता गोखले यांनी 'संशोधन आराखडा आणि नमुना निवडीच्या पायऱ्या" या विषयावर मार्गदर्शन केले. समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मयूरेश पाटील यांनी ओळख करून दिली. आकाश ब्राम्हणे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रतिभा देसाई, डॉ प्रल्हाद माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2025
पुण्यनगरी

# संविधानाची मूलतत्त्वे खेडोपाडी पोहोचवा : डॉ. भणगे

**गारगोटी : प्रतिनिधी**

आपल्या संविधानाची मूलतत्वे ही केवळ कागदोपत्री न राहता ती खेडोपाडी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचली पाहिजेत. प्रजासत्ताकची खरी कसोटी म्हणजे समाजाच्या मागासवर्गाचा विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी केले.

श्री मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'प्रजासत्ताक भारत, कल्पना आणि वास्तव' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई यांच्या हस्ते राज्यघटना प्रास्ताविकेचे अनावरण करून उद्घाटन झाले. संचालक डॉ. पी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

मधुकर देसाई म्हणाले, केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर जगण्याचा अधिकारही महत्त्वाचा आहे. याबाबत ठोस अंमलबजावणी झाली पाहिजे. संचालक डॉ. पी. बी.पाटील म्हणाले, बेरोजगारी, महागाई, सामाजिक असमानता या सर्वांशी सामना करण्यासाठी आपण एकत्रित झटले पाहिजे.

प्रथम सत्रात 'स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्य' यावर शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे, डॉ. शहाजीराव वारके यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अरविंद चौगले, उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, डॉ. युवराज देवाळे, डॉ. वाय. डी. दीक्षित, डॉ. अशोक कांबळे यांची मनोगते झाली. यावेळी डॉ. रेणुका मेंगाने, प्रा. श्रीकांत देसाई उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. ज्योती सातवेकर व डॉ. विनया जाधव यांनी केले, तर आभार डॉ. अरुण नलवडे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 OCT 2025
तरुण भारत

# 'पुस्तक वाचनासोबत माणूस आणि निसर्ग वाचता यावा'

प्रतिनिधी
कोल्हापूर

उत्तम पुस्तक वाचनाबरोबर माणूस आणि निसर्ग वाचता आला पाहिजे. पुस्तक वाचून माणूस समृद्ध होतो. म्हणून वाचन ही सवय नसून संस्कृती आहे, असे प्रतिपादन नांदेड येथील लेखक, कवी प्रा. मनोज बोरगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्यावतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. 'वाचन संस्कृती आणि नदीष्टची निर्मितीप्रक्रिया' यावर डॉ. बोरगावकर यांनी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

प्रा. बोरगावकर म्हणाले, वाचनातूनच संवेदनशीलता निर्माण होते आणि समाज बदलण्याची शक्ती जन्माला येते. 'नदीष्ट' कादंबरी ही केवळ कथा नसून, मानवी निसर्ग, वेदना, नाती आणि समाज यांचा सखोल शोध आहे. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, वाचन हीच खरी विचारशक्तीची जननी आहे. लेखक आणि निसर्ग यांचे नाते जितके जिव्हाळ्याचे, तितक्याच तीव्रतेने त्यांच्या लेखनातून जीवन उलगडते.

डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. एकनाथ अंबोकर, डॉ. रमेश साळुंखे, युवराज कदम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2025
पुढारी

# आदित्य सावळकर, शर्वरी कबनूरकर विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत आदित्य सावळकर (शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग) व शर्वरी कबनूरकर (केआयटी कॉलेज) यांनी विजेतेपद पटकावले. ऋषीकेश कबनूरकर व सृष्टी कुलकर्णी (दोघे विवेकानंद कॉलेज) यांनी उपविजेतेपद, तर श्रीरंग बोंडले (विलिंग्डन कॉलेज सांगली) व वैष्णवी पाटीलने (कॉमर्स कॉलेज) तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठ संघात स्थान मिळविणारे अन्य खेळाडू असे : पुरुष - सारंग पाटील (कॉमर्स कॉलेज), आदित्य टिळक (वालचंद कॉलेज सांगली), साहिल सावंत (सातारा). महिला - मयुरी सावळकर (सायबर कॉलेज), दिशा पाटील (डीकेटीई इचलकरंजी), साक्षी पाटील (सातारा). राखीव खेळाडू : पुरुष - तन्मय पवार (डीकेटीई इचलकरंजी), फुनटेज थियाडोरा (आयजीएम कराड), अथर्व पंढरपूर (आय. एम. कॉलेज सातारा), सर्वेश बेंद्रे (गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज कराड). महिला - गायत्री रेंदाळे (वालचंद सांगली), किरण पाटील (एसजीएम कॉलेज कराड), अर्पिता कारंडे (केबीपी इस्लामपूर), श्रावणी गुल्हाने (वालचंद कॉलेज, सांगली).

बक्षीस समारंभ प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते व निवड समितीचे चेअरमन प्रा. किरण पाटील, आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, निवड समिती सदस्य डॉ. स्मिता कुंभार (सातारा), राहुल लहाने (भोगावती कॉलेज), निरीक्षक सुरेश धुरे, प्रा. रामेश्वरी गुंजीकर, राष्ट्रीय पंच आरती मोदी, डॉ. विकास जाधव (विवेकानंद), डॉ. गौतम घुणके, डॉ. विद्या पाटील व सुप्रिया केळकर यांच्या हस्ते झाला.



कोल्हापूर : निवडण्यात आलेल्या बुद्धिबळपटूंसोबत प्रमुख पाहुणे, निवड समिती सदस्य, पंच व संयोजक.